# दिनांक 17/04/2025

1 रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/04/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास मौजे वावेपोटगे पो.शंणवई मौजे फिर्यादी यांचे घराचे पडवीमध्ये, ता.रोहा येथे आरोपीत क्र.1 याने फिर्यादी यांचे सोबत त्याचे भाउ आरोपीत क्र.2 व पत्नी आरोपीत क्र.3 व बहीण आरोपीत क.4 यांचे सोबत दि.14-4-2025 रोजी भांडणाचा राग मनात धरून आरोपीत क्र.1 ते 5 यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी यांचा मोबाईल दगडाने ठेचुन नुकसान करून फिर्यादी व त्यांचे पत्नीला हाताबुक्याने फाईट लाथा मारून मारहाण शिवीगाळ केल्याने फिर्यादी यांचे नाक व जबडयास जबर दुखापत तसेच त्ंयाची पत्नीस दुखापत केली आहे.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.72/2025, भारतीय न्याय संहीता 2023चे कलम 117,352,324(2),189(2),190,191(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/सुनील शिरसाठ हे करीत आहेत.

2. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/04/2025 रोजी 13:01 वा 14/04/2025 रोजी 13.01 वा. ते 17.15 वा च्या दरम्यान महिला फिर्यादी रा.रुम नं.04 जुहुकर वाडी,दामुअण्णा चाळ ,सहारा रोड वेन्कुट बिलाच्या पाठीमागे ,कोलडोंगरी ,अंधेरी इस्ट मुंबई मौजे विलेपार्ले रेल्वे स्टेशन ते पनवेल रेल्वे स्टेशन ते लोकल ट्रेन मध्ये तसेच पनवेल ते मोहपाडा सा प्रवासादरम्यान मुददेमाल हा कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांची पर्स मधील छोटी ज्वेलर्स पाउच मधील एकूण 64,000/-रुपये किमतीचे सोन्याचे दागिने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या हेतुने काढून चोरून नेली आहे.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.81/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 303 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोना/सोनम शेळके हे करीत आहेत.

3. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/04/2025 रोजी 12:30 वा च्या सुमारस मौजे डाउन लाईन मुंबई ते पुणे जाणा-या रेल्वे रुळाचे शेजारी 112/116 या पोल स्टेशन ठाकुरवाडी गावचे हद्दीत, ता.कर्जत येथे अनोळखी मयत महीलेस वय अंदाजे 28 ते 32 वर्षे दि.16/04/2025 रोजी 12.30 वाजण्याचे पुर्वी कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा चेहरा व डोक्याला प्लास्टीकच्या पिशवीने बांधुन तीचे हात पाय नायलॉनच्या दोरीने बांधुन तीला एका पिंक रंगाच्या ट्राली बॅगमध्ये भरुन डाउन लाईन मुंबई ते पुणे जाणा-या रेल्वे रुळाचे शेजारी 112/116 या पोल जवळ स्टेशन ठाकुरवाडी गावचे हद्दीत,

ता.कर्जत, जि.रायगड येथे फेकुन दिले.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.103/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 103(1),238 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनि/सुरेंद्र गरड हे करीत आहेत.

4. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/04/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे वडगांव तुळजा भवानी मंदीर जवळ, सुरेश पाटील चाळ पेण येथे महिला फिर्यादी ही स्वत:ची स्कुटी पार्क करीत असता स्कुटी पार्क करण्याचे कारणावरून महिला आरोपी क्रमांक 02 हि फिर्यादी सोबत भांडण शिवीगाळी करीत असताना फिर्यादीचे वडील भांडण सोडविण्यासाठी आले असता आरोपीत क्रमांक 01 याने फिर्यादीच्या वडीलांना मारहाण केली व फिर्यादीच्या अंगावरील कुर्ती ओढुन गळयाजवळ नखाने ओरबडले तसेच आरोपीत क्रमांक 02 हीने फिर्यादीच्या आई हिला मारहाण केली आरोपीत क्रमांक 01 यांच्या कृती मुळे फिर्यादीस लज्जा निर्माण होवुन तिचा विनयभंग केला.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.70/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 7476 115 (2),352,351 (2),351 3,5 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोना/सुप्रिया शिंदे हे करीत आहेत.

5. तळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/04/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास आरोपीत याने पिडीत मुलगी ही अल्पवयीन आहे हे माहित असून सुध्दा त्याने तिचे अज्ञानपणाचा फायदा घेवून तिचेवर लैंगिक अत्याचार केला. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 16/04/2025 रोजी 23:18 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत तळा पोलीस ठाणे गुरनं.13/2025, बाल लै.अत्या.संरक्षण (POCSO)अधिनियम, 2012 4,5(M),6, BNS 2023. 64(1),64(2)(I),65(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/सतीश गवई हे करीत आहेत.

6. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/04/2024 रोजी 00:00 वा ते दि.15/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे राजमुद्रा चौक कर्जत ते सेंट जोसेफ कॉनव्हेंट,स्कुल लोधीवली, ता.खालापुर येथे आरोपीत रा.वदप, ता.कर्जत हा सेंट जोसेफ कॉनव्हेंट,स्कुल लोधीवली ता.खालापुर या शाळेतील खाजगी बसवर क्लिनर म्हणुन कामास आहे. आरोपीत याने फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी तसेच त्याच शाळेतील ईतर तिन अल्पवयीन मुलींना त्या अल्पवयीन आहेत हे माहित असताना देखील स्कुलबस मधुन शाळेत घेवुन जात असताना बसमधील ड्रायव्हरचे पाठीमागिल बाजुचे सीटवर बसण्याकरीता त्याचे जवळ बोलावुन त्यांना त्याचे मांडीवर बसवुन त्यांचे अश्लील चाळे व पिडीत अल्पवयीन मुलींना हाताने मारहाण केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.104/2025, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण)अधि.2000 चे कलम 8,10,12 भारतीय न्याय संहिता-2023 चे कलम-74,115(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मसपोनि/लटपटे हे करीत आहेत.

7. खोपोली पोलीस हद्दीत दिनांक 16/04/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे फुडमॉल समोर एच पी पेट्रोल पंपचे समोर खोपोली, खालापुर येथे आरोपीत रा.फुलपुर मोरी, महाराजापुर, कुंदा, प्रतापगड उत्तरप्रदेश याने त्याचे ताब्यातील ट्रेलर क्र.नं.MH-46-BU-4424 हा अतिवेगाने हयगयीने बेदरकारपणे चालवुन फिर्यादी यांचे ताब्यातील कार क्र.XUV 700 कार क्र.UP 16 DD5281 हीस पुढील उजव्या बाजुस ठोकर मारुन अपघात केला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.105/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 281 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/सावंत हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 16.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 238 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,48,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.